ePaper

**बापरे! फ्लायदुबईच्या 'त्या' को-पायलटचे 9/11 हल्ल्याशी कनेक्शन?**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 11 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

मोशीत उभारणार 'नाना पाटेकर नाट्यगृह'?

## सीजेपीचे दिपके, दास, रांका, राठीसह शेकडो आंदोलक पोलिसांच्या ताब्यात

# दिल्ली पोलिस अ‍ॅक्शन मोडवर!





**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्लीतील साउथ एवेन्यू येथे विरोध प्रदर्शन करत असताना तृणमूल काँग्रेसच्या (TMC) प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बनर्जी यांच्यासह पक्षाच्या ५ प्रमुख नेत्यांना दिल्ली पोलीस आणि सीआरपीएफने (CRPF) ताब्यात घेतले. या कारवाईदरम्यान ममता बनर्जी यांच्या व्यतिरिक्त डेरेक ओ'ब्रायन, डोला सेन, प्रतिमा मंडल आणि समीरुल इस्लाम या नेत्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेऊन प्रिजन व्हॅनमध्ये बसवून पोलीस स्टेशनमध्ये नेले.**

याच आंदोलनादरम्यान आम आदमी पार्टीचे (AAP) राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्यासोबत आपचे नेते संजय सिंह, सौरभ भारद्वाज आणि दुर्गेश पाठक यांनाही पोलिसांनी डिटेन केले. पोलिसांकडून ताब्यात घेतल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवरून पोस्ट करत "मोदी जी की तानाशाही से हम डरने वाले नहीं हैं," अशी प्रतिक्रिया दिली.

या कारवाईनंतर तृणमूल काँग्रेसने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट करत दिल्ली पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला. लोकशाहीत शांतिपूर्ण प्रदर्शन करणाऱ्यांना अटक करणे कधीपासून सामान्य बाब झाली, असा सवाल पक्षाने केला. शांतिपूर्ण विरोधाच्या वेळी संवादाऐवजी थेट अरेस्टची कारवाई करणे हे देशातील लोकतांत्रिक मूल्यांच्या स्थितीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते, असे TMC ने म्हटले. TMC ने आपल्या पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टॅग करत 'मो-शाह की जोड़ी' कितीही सीमा ओलांडली, तरी कोणतीही सरकार उत्तरदायित्वाच्या वर नाही आणि कोणतीही सत्ता चिरकाल टिकत नाही.

### आम्हाला अटक करा

सरकारकडून आंदोलकांवर होत असलेल्या कारवाईवर भाष्य करताना राहुल गांधी यांनी थेट आव्हान दिले. ते म्हणाले, "मोदीजी, तुम्हाला जे करायचे आहे ते करा. १० हजार, २० हजार किंवा ५० हजार कितीही पोलीस बोलवायचे असतील तर बोलवा. सर्व नेत्यांना अटक करा, तरुणांना अटक करा, आम्हा सर्वांना तुरुंगात टाका. आम्ही तुम्हाला चोहोबाजूंनी घेरले आहे आणि आम्ही आता अजिबात मागे हटणार नाही. हे माझे शब्द लक्षात ठेवा, आम्हाला जी माहिती हवी होती, ती आमच्याकडे आधीच आली आहे."

### 'गेल्या १० वर्षांपासून आरपारची लढाई'

राहुल गांधी म्हणाले, "मी गेल्या एका दशकाहून अधिक काळापासून नरेंद्र मोदी आणि आरएसएस विरोधात लढत आहे. मी त्यांना खूप जवळून ओळखतो. प्रतिस्पर्ध्याला जसे आतून-बाहेरून ओळखावे, तसेच मी त्यांना ओळखतो. भीती आणि पळपुटेपणा हाच या लोकांचा मुख्य स्वभाव आहे."

# आंदोलनस्थळी ड्रोन उडविल्याप्रकरणी गुन्हा

## एमपीएससी परीक्षार्थ्यांवर पोलिसांची दुसरी कारवाई; आंदोलनाची परवानगी रद्द

**महाईन्यूज । पुणे**

**नवी पेठेतील एस. एम. जोशी पुलावरील एमपीएससी परीक्षार्थ्यांच्या आंदोलनस्थळी विनापरवानगी ड्रोन उडविल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी विद्यार्थी प्रतिनिधींसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. एमपीएसएसी आंदोलनाशी संबंधित दाखल करण्यात आलेला हा दुसरा गुन्हा आहे.**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अध्यक्षांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांसाठी १ ऑक्टोबरपासून नवी पेठेतील एस. एम. जोशी पूल परिसरात आंदोलन सुरू आहे. आंदोलनाची परवानगी रद्द केल्याची माहिती दिल्यानंतरही नवी पेठेतील लालबहादूर शास्त्री रस्त्यावर बेकायदा आंदोलन केल्याप्रकरणी शुक्रवारी (९ ऑक्टोबर) एमपीएससी विद्यार्थी प्रतिनिधींसह १५ जणांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर शनिवारी (१० ऑक्टोबर) विनापरवानगी ड्रोन उडविल्याप्रकरणी दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत हवालदार युवराज टोळे यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी दिगंबर भारत खारे, प्रमोद पाटील, शिवराज मोरे, ऋषिकेश गागुर्डे, अक्षय कांबळे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हवालदार टोळे ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास एस. एम. जोशी पूल परिसरात तैनात होते. त्या वेळी आंदोलनस्थळी ड्रोन उडताना दिसला. टोळे यांनी शोध घेतला असता, आंदोलनाच्या मागील बाजूस दिगंबर खारे दूरसंवेदकाच्या (रिमोट कंट्रोल) साहाय्याने ड्रोन चालवत असल्याचे आढळले.

त्यानंतर खारे यांच्याकडे ड्रोन उडवून चित्रीकरण करण्यासाठी आवश्यक परवानगी, तसेच स्थानिक पोलिसांची परवानगी आहे का, अशी विचारणा करण्यात आली. तसा कोणताही परवाना वा पोलिसांची परवानगी नसल्याचे त्याने सांगितले. अधिक चौकशी केली असता, आंदोलनात सहभागी प्रमोद पाटील आणि इतरांच्या सांगण्यावरून ड्रोन आणल्याचे त्याने सांगितल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसांनी ड्रोन जप्त केला असून, विश्रामबाग पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.

### विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा वणवा पेटणार?

साधी स्कॉलरशिपची परीक्षा यांना घेता येत नाही हे दुर्दैव आहे. या आंदोलन काळात तुम्ही आ. रोहित पवार यांच्यासोबत लढा देत आहात. सर्वसामान्यांच्या व्यथा या सरकारला कळत नाहीत. त्यामुळे येणाऱ्या काळात आंदोलनाची व्यापकता वाढवून प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करावे लागेल, असा इशारा उद्धवसेनेचे नेते अंबादास दानवे यांनी दिला. दानवे म्हणाले की, एमपीएससीच्या अध्यक्षांना घरी पाठवले पाहिजे. अन्यायाचा कहर झाला गप्प किती बसणार. उचल तरुणा तलवार... विचाराची तलवार. दुर्गा उत्सवात येथे बसलेल्या दुर्गा राक्षसांचे निर्दालन करतील. पोलिसांनाही विनंती आहे, तुमची पोरं देखील अभ्यास करत आहेत. तुम्ही आम्ही एक आहोत. तेव्हा सरकार सांगितले म्हणून दिल्ली पोलिसांसारखे वागू नका.

### ‘माझ्याविरुद्ध गुन्हा दाखल करा’

‘लोकप्रतिनिधी म्हणून एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात सहभागी झालो. पोलीस माझ्याऐवजी विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना जाणीवपूर्वक त्रास देत आहेत. सरकारचे ऐकून पोलीस विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करणे, नोटीस बजावणे असे प्रकार करीत आहेत. केवळ आंदोलन मोडीत काढण्यासाठी पोलिसांकडून हा त्रास दिला जात आहे. मात्र, कोणत्याही परिस्थितीत एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांचा राजीनामा घेतल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही. याबाबत विश्रामबाग पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली. आंदोलनाला परवानगी मिळण्याबाबत अर्ज सादर केले आहेत,’ असे आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

# म्हाडा पुणे मंडळ ४४६२ घरांची सोडत; तांत्रिक अडचणींमुळे इच्छुक अर्जदार हैराण

**महाईन्यूज । पुणे**

**म्हाडाच्या पुणे मंडळाने पुण्यातील ४,४६२ घरांच्या सोडतीसाठी नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू केली आहे. ही प्रक्रिया संपुष्टात येण्यासाठी आता केवळ पाच दिवस शिल्लक असताना इच्छुक अर्जदारांना अर्ज भरण्यात मोठी अडचण येत आहे. तांत्रिक अडचणींमुळे अर्ज भरण्यास विलंब होत असल्याने अर्जदारांमध्ये नाराजी आहे. वास्तव्याचा दाखला, उत्पन्नाचा दाखला आणि प्राप्तिकर प्रमाणपत्राची पडताळणी होण्यास विलंब होत आहे.**



महाआयटीच्या संगणकीय प्रणालीत तांत्रिक बिघाड असल्याने त्याचा फटका अर्जदारांना बसत आहे. त्यामुळे आता म्हाडाच्या माहिती व संचार तंत्रज्ञान विभाग महाआयटीकडे तांत्रिक बिघाड दूर करण्यासंबंधी पाठपुरावा करीत आहे.

पुणे मंडळाला १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनेअंतर्गत १,४९१ घरे उपलब्ध झाली. तर २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत २,९७१ घरे मंडळाला सोडतीसाठी मिळाली. या एकूण ४,४६२ घरांच्या सोडतीसाठी पुणे मंडळाने ऑगस्टमध्ये जाहिरात प्रसिद्ध करून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेस सुरुवात केली. ही प्रक्रिया १५ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार होती. मात्र तांत्रिक अडचणींमुळे अनेक इच्छुक अर्ज भरू न शकल्याने आणि इतर कारणांमुळे या प्रक्रियेस मंडळाने मुदतवाढ दिली. या मुदतवाढीनुसार आता १५ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू राहणार आहे. ही प्रक्रिया संपुष्टात येण्यासाठी आता केवळ पाच दिवस शिल्लक असताना मागील काही दिवसांपासून अर्जदार तांत्रिक अडचणींमुळे हैराण झाले आहेत.

उत्पन्नाचा दाखला, प्राप्तिकर प्रमाणपत्र आणि वास्तव्याचा दाखला यांसारख्या कागदपत्रांची पडताळणी होण्यास वेळ लागत आहे वा पडताळणी होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे याचा फटका अर्जदारांना बसत आहे. याविषयी पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी मागील काही दिवसांपासून अर्ज भरताना तांत्रिक अडचणी येत असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला.

महाआयटीच्या संगणकीय प्रणालीमध्ये अडचणी येत असल्याने काही कागदपत्रांची पडताळणी होत नाही वा त्यास वेळ लागत आहे. म्हाडाच्या सोडतीच्या संगणकीय प्रणालीत मात्र कोणताही बिघाड नाही, असेही साकोरे यांनी सांगितले. तर म्हाडाचा माहिती व संचार तंत्रज्ञान विभाग या अडचणी दूर करण्यासाठी महाआयटीशी चर्चा करत असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, ही परिस्थिती अशीच सुरू राहिली तर नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृतीस मुदतवाढ देणार का, अशी विचारणा केली असता याबाबत म्हाडाचे उपाध्यक्षच निर्णय घेतील, असे साकोरे यांनी सांगितले.

# मोशीत उभारणार ‘नाना पाटेकर नाट्यगृह’?

## कला - सांस्कृतिक केंद्रासाठी आमदार महेश लांडगे यांची महापालिका आयुक्तांकडे मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्यासाठी मोशी–चऱ्होली–चिखली या वेगाने विकसित होणाऱ्या निवासी पट्ट्यात दिवंगत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या नावाने भव्य नाट्यगृह आणि बहुउद्देशीय सांस्कृतिक केंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. या प्रकल्पासाठी योग्य जागा निश्चित करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावा, अशी विनंती त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**




पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या आणि विस्तार झपाट्याने वाढत असताना मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आधुनिक सुविधांनी युक्त सभागृहाची आवश्यकता निर्माण झाली आहे. पुण्यातील गणेश कला क्रीडा मंचाच्या धर्तीवर शहरात मोठ्या आसनक्षमतेचे नाट्यगृह उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. या पार्श्वभूमीवर या मागणीला ठोस प्रकल्पाचे स्वरूप देऊन प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी, अशी भूमिका लांडगे यांनी मांडली आहे.

मोशी, चऱ्होली आणि चिखली परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प उभे राहत असून नागरिकांची वस्ती वाढत आहे. या भागातील नागरिक, कलाकार, नाट्यसंस्था, शाळा आणि महाविद्यालयांना नाट्यप्रयोग, संगीत मैफिली, साहित्य संमेलने, व्याख्याने तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज व्यासपीठ उपलब्ध व्हावे, हा या प्रस्तावामागील प्रमुख उद्देश आहे. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टी, रंगभूमी आणि सामाजिक क्षेत्रातील दिवंगत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून प्रस्तावित केंद्राला ‘नाना पाटेकर नाट्यगृह व सांस्कृतिक केंद्र’ असे नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे. या माध्यमातून त्यांच्या स्मृती जपण्याबरोबरच नवोदित कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल आणि शहराच्या सांस्कृतिक ओळखीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### आधुनिक सुविधा आणि वाहतूक व्यवस्थेवर भर

प्रस्तावित प्रकल्पात प्रशस्त रंगमंच, दर्जेदार ध्वनी व प्रकाशयोजना, कलाकारांसाठी स्वतंत्र कक्ष, सरावासाठी जागा, लघु कार्यक्रमांसाठी सभागृह, दिव्यांगसुलभ प्रवेशव्यवस्था आणि आवश्यक सुरक्षा सुविधांचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर पुरेसे वाहनतळ, सार्वजनिक वाहतुकीची उपलब्धता आणि परिसरातील वाहतूक व्यवस्थापन यांचा जागा निश्चित करतानाच विचार करावा, असेही लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे. संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन जागा निश्चिती आणि प्रकल्प अहवालाची कार्यवाही तातडीने सुरू करावी, तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात द्यावी. याबाबत सर्वसाधारण सभेत तसा ठराव मंजूर करावा, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

> “ पिंपरी-चिंचवड शहराची ओळख केवळ औद्योगिक नगरी म्हणून मर्यादित न राहता, सांस्कृतिक आणि कलाविश्वातील एक महत्त्वाचे केंद्र म्हणूनही निर्माण व्हावी, हा आमचा प्रयत्न आहे. मोशी–चऱ्होली–चिखली परिसरातील वाढती लोकसंख्या आणि सांस्कृतिक गरजा लक्षात घेता, येथे आधुनिक सुविधांनी सुसज्ज भव्य नाट्यगृह उभारणे आवश्यक आहे. दिवंगत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या नावाने हे नाट्यगृह उभारल्यास त्यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाचा सन्मान होईल. त्याचबरोबर नवोदित कलाकार, स्थानिक नाट्यसंस्था आणि सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिभावंतांना आपली कला सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळेल. हा प्रकल्प केवळ वास्तू उभारण्यापुरता मर्यादित न राहता, शहराच्या सांस्कृतिक विकासाला चालना देणारा आणि पुढील पिढ्यांना कलेशी जोडणारा उपक्रम ठरावा, अशी आमची भूमिका आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# ‘पवना’त पाण्यावर तरंगणारे सौर ऊर्जा पॅनल; वीजनिर्मितीसाठी महापालिकेचे नियोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पवना धरणातील पाण्यावर तरंगणारे (फ्लोटिंग) सौर ऊर्जा पॅनल बसविण्यात येणार आहे. या माध्यमातून वीजनिर्मिती केली जाणार असून, त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येणार आहे.**




महापालिकेची क्षेत्रीय कार्यालये, शाळा, रुग्णालये, महापालिका भवन, गोदाम, क्रीडा संकुले, नाट्यगृहे, पाणी शुद्धीकरण केंद्रे अशा वेगवेगळ्या २६४ प्रशासकीय इमारती आहेत. त्यांपैकी ९५ इमारतींवर सौर ऊर्जा यंत्रणा सुरू करण्यात आली आहे. इतर २१ इमारतींवर सौर ऊर्जा पॅनल बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. उर्वरित १४८ इमारतींवर यंत्रणा बसविण्याचे नियोजन आहे. मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात सुका कचरा जाळून १४ मेगावॅट वीजनिर्मिती केली जात आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महापालिकेने वीजदेयकापोटी १५८ कोटी रुपये महावितरण कंपनीला दिले आहेत. या पार्श्वभूमीवर मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणावर पाण्यावर तरंगणारे (फ्लोटिंग) सौर ऊर्जा पॅनल बसवण्यात येणार आहेत.

या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात या कामाचा समावेश करण्यात येणार आहे. महापालिका क्षेत्रीय कार्यालये, क्रीडासंकुले, नाट्यगृहे, शाळा व सर्व इमारतींवर पॅनल बसविण्यासाठी ३७.१० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात आहे. या लेखाशीर्षावरील एक लाख रुपयांची तरतूद अपारंपरिक ऊर्जा स्रोतापासून वीजनिर्मिती करणे या लेखाशीर्षात वाढवण्यात आली आहे.

### पवना धरणातून ५४० एमएलडी पाणीपुरवठा

सद्य:स्थितीत पवना धरणातून ५४०, आंद्रातून ९५ आणि एमआयडीसीकडून ३० असे ६६५ एमएलडी पाणी एका दिवसाला महापालिका उचलते. शहरात २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. या निर्णयाला पुढील महिन्यात सात वर्ष पूर्ण होतील. त्यानंतरही एक दिवसाआडच पाणीपुरवठा कायम आहे. एल निनोच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागात पर्जन्यमानात मोठी घट झाली आहे. असे असले तरी पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणारे पवना आणि आंद्रा धरण शंभर टक्के भरले आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर १६ ऑक्टोबरपासून दहा टक्के पाणी कपात करण्याचे आदेश जलसंपदा विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिला आहे.



## भूमिका

**राजधानी दिल्लीसह देशाच्या विविध भागांत आंदोलनांचे वातावरण तापलेले असताना, पोटनिवडणुकांच्या निकालांनी राजकीय पक्षांना जनतेच्या मनातील भावना समजून घेण्याची संधी दिली आहे. दिल्लीतील आंदोलनांची धामधूम, विरोधकांची आक्रमक भूमिका आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप यांमुळे प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधले गेले.**

# आंदोलनांचा गदारोळ की जनतेचा कौल?



मतदारांनी निवडणुकीच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट केल्याचा दावा केला जात आहे. पश्चिम बंगालमधील भाजपचे यश, पुद्दुचेरीतील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटकपक्षाचा विजय आणि तामिळनाडूमधील टीव्हीकेची कामगिरी या घडामोडी राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या ठरल्या आहेत.

दिल्लीमध्ये आंदोलनांच्या माध्यमातून केंद्र सरकारला घेरण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनीही आंदोलनात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केल्याचे सांगितले जात आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या आंदोलनाशी केजरीवाल यांचा संबंध असल्याचे आरोप राजकीय वर्तुळात केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनीही आंदोलकांना रोखण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी तयारी केल्याचे चित्र आहे. काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनीही गेल्या काही दिवसांत आंदोलनांच्या माध्यमातून सरकारविरोधातील नाराजी व्यक्त करण्याचा प्रयत्न केला.

मात्र, आंदोलनांची तीव्रता आणि निवडणुकांमधील जनतेचा कौल यांची तुलना करताना राजकीय पक्षांनी अधिक सावधपणे विचार करण्याची गरज आहे. रस्त्यांवरील आंदोलनांना मिळणारी प्रसिद्धी आणि प्रत्यक्ष मतदानातून व्यक्त होणारा जनतेचा कल या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे केवळ आंदोलनांमधील गर्दीवरून जनमताचा अंदाज बांधणे योग्य ठरणार नाही.

तामिळनाडू, पुद्दुचेरी, पश्चिम बंगाल आणि आसाममधील पोटनिवडणुकांच्या निकालांनी राजकीय चर्चेला नवे वळण दिले. पश्चिम बंगालमधील दोन्ही विधानसभा पोटनिवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने विजय मिळविल्याचे वृत्त समोर आले. पुद्दुचेरीतही भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटकपक्षाने एका पोटनिवडणुकीत यश संपादन केले. दुसरीकडे, तामिळनाडूमध्ये नुकत्याच सत्तेवर आलेल्या टीव्हीके पक्षाने विधानसभेच्या दोन्ही पोटनिवडणुका जिंकल्याचे सांगितले जाते.

आसाममधील नागांव लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भाजपचा उमेदवार मतमोजणीदरम्यान मोठ्या मताधिक्याने आघाडीवर असल्याचे वृत्त होते. मात्र, अंतिम निकाल जाहीर होण्यापूर्वी त्या जागेबाबत ठाम निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे या निवडणुकांच्या एकत्रित निकालांचे विश्लेषण करताना प्रत्येक राज्यातील स्थानिक राजकीय परिस्थिती, उमेदवारांची ताकद आणि मतदारांचे प्रश्न लक्षात घेणे आवश्यक आहे.

पश्चिम बंगालमधील रेजीनगर मतदारसंघात मुस्लिम मतदारांची लक्षणीय संख्या असल्याने तेथील निकालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या मतदारसंघात स्थानिक राजकीय प्रभाव असलेल्या हुमायून कबीर यांच्या मुलाने निवडणूक लढविल्याचे सांगितले जाते. अशा परिस्थितीत भाजपच्या उमेदवाराने विजय मिळविल्याची बाब राजकीय चर्चेचा विषय ठरली. मात्र, एखाद्या मतदारसंघातील निकालावरून संपूर्ण समाजाचा किंवा विशिष्ट धार्मिक समुदायाचा राजकीय कल निश्चित करता येत नाही. मतदार मतदान करताना स्थानिक विकास, उमेदवाराची प्रतिमा, पक्षाची धोरणे, सामाजिक समीकरणे आणि इतर अनेक घटकांचा विचार करतात. त्यामुळे अशा निकालांचे विश्लेषण करताना व्यापक सामाजिक निष्कर्ष काढण्याऐवजी स्थानिक परिस्थिती समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

## प्रासंगिक »

# गावातील विहिर

**एका गावात दोन शेतकरी शेजारीशेजारी शेती करत होते. पहिला शेतकरी गणेश पाण्याचा वापर जपून करायचा, तर दुसरा शेतकरी महेश गरजेपेक्षा जास्त पाणी वाया घालवायचा. एके वर्षी पाऊस कमी झाला.**

गावातील विहिरींची पाणीपातळी खाली जाऊ लागली. महेशच्या विहिरीतील पाणी लवकर संपले. त्याची पिके सुकू लागली. गणेशने मात्र ठिबक सिंचनाचा वापर केला होता आणि पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरला होता. त्यामुळे त्याची पिके बऱ्यापैकी टिकून राहिली.

महेशने गणेशकडे मदत मागितली. गणेशने त्याला पाणी दिले; पण त्याचबरोबर पाण्याचे नियोजन कसे करावे, हेही शिकवले. पुढील हंगामात महेशने शेतात पाण्याची बचत करणारी व्यवस्था उभारली. त्याने पावसाचे पाणी साठवण्यासाठी छोटा तलावही तयार केला.

पुढे पाऊस कमी झाला, तरी त्याच्या शेतीला फारसा फटका बसला नाही. महेशला समजले की संकट आल्यावर धावपळ करण्यापेक्षा संकट येण्यापूर्वी तयारी करणे अधिक महत्त्वाचे आहे.

- तात्पर्य : संसाधनांचा योग्य वापर आणि दूरदृष्टी संकटाच्या काळात मोठा आधार ठरतात.

बदलत्या शिक्षण व्यवस्थेतील मानवी स्पर्श जपणारा नवा सहप्रवासी'यंत्रे माहिती देऊ शकतात. पण विद्यार्थ्यांच्या डोळ्यात स्वप्ने, आत्मविश्वास आणि माणुसकी जागवण्याचे सामर्थ्य आजही शिक्षकांकडेच आहे.'

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शिक्षक




कारण एआय माहिती देऊ शकते, पण विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करू शकत नाही. एआय प्रश्नांची उत्तरे शोधून देऊ शकते, पण अपयशानंतर खचलेल्या विद्यार्थ्याच्या पाठीवर प्रेमाने हात फिरवू शकत नाही. एआय सुंदर सादरीकरण तयार करू शकते, पण 'तू नक्की यशस्वी होशील' हे मनापासून सांगू शकत नाही. प्रत्येक वर्गात काही मुले शांत असतात... त्यांची भाषा शिक्षकच समजतो. काही विद्यार्थी अभ्यासात मागे असतात. काहींना वाचन कठीण वाटते. काहींना गणिताची भीती वाटते, तर काही विद्यार्थ्यांना वर्गासमोर बोलण्याचे धाडसच होत नाही. अनेकदा त्यांना एत्दै थही असा शिक्का लावला जातो. पण खरे पाहता ही मुले कमी बुद्धिमान नसतात. त्यांना फक्त शिकण्याचा वेगळा मार्ग हवा असतो. एखाद्या विद्यार्थ्याला चित्रातून समजते, एखाद्याला व्हिडिओतून, तर एखाद्याला प्रत्यक्ष प्रयोगातून, काही विद्यार्थ्यांना एकच धडा तीन-चार वेळा वेगवेगळ्या पद्धतीने समजावून सांगावा लागतो. इथेच एआय शिक्षकांचा हात मजबूत करते.

आज शिक्षक काही मिनिटात चित्रांसह नोट्स तयार करू शकतात. मराठी, कन्नड आणि इंग्रजी भाषेत एकाच धड्याचे वेगवेगळे स्वरुप तयार करू शकतात. विज्ञानातील प्रयोगांचे ॲनिमेशन दाखवू शकतात. गणिताची उदाहरणे टप्प्याटप्प्याने समजावू शकतात. वाचनात अडचण असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ऑडिओ सामग्री तयार करू शकतात. अशा अनेक सुविधा पूर्वी वेळेअभावी शक्य नव्हत्या. एआय शिक्षकांची जागा घेऊ शकत नाही. एआयमुळे शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचतात.

समाज अनेकदा विद्यार्थ्यांच्या अडचणींबद्दल बोलतो; पण शिक्षकांच्या आयुष्याकडे फार कमी जण लक्ष देतात. सकाळी प्रार्थना, त्यानंतर सलग तासिका, प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, विविध शासकीय अहवाल, ऑनलाईन नोंदी, पालकसभा, प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा, सांस्कृतिक कार्यक्रम, निवडणूक किंवा जनगणना यासारख्या अतिरिक्त जबाबदाऱ्या, या सर्वांमध्ये शिक्षक दिवसाचा मोठा भाग घालवत असतो. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र अभ्याससाहित्य तयार करण्याची इच्छा असली तरी वेळ अपुरा पडतो. प्रश्नसंच, कार्यपत्रिका, सादरीकरणे, भाषांतर, मूल्यांकन विश्लेषण, प्रगती अहवाल यासारखी पुनरावृत्तीची कामे एआय काही मिनिटात करू शकते. त्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांशी अधिक संवाद साधू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



काय दिनकरा ।
केला कोंबड्यानें खरा ॥१॥

कां हो ऐसा संत ठेवा ।
भार माझे माथां देवा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी पाणी आडवा,पाणी जिरवा

## दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी विभागीय समन्वय, प्रभावी नियोजन आणि जलद अंमलबजावणीवर भर

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून या मोहिमेला गती द्यावी, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत असून, या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.**



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणेने विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत उत्तम नेतृत्व व कार्यक्षमता दाखविली आहे. अडचणीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा उत्साहाने आणि जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो, हे आपण अनुभवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेपासून काम सुरू असल्याचे चित्र यापूर्वी दिसले आहे. त्याच कार्यतत्परतेने आणि समर्पित भावनेने आता जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

जलसंधारणाच्या कामांसाठी या बैठकीत निश्चित झालेल्या संकल्पनांच्या आधारे एकात्मिक कार्ययोजना तयार करावी. तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम प्रशासकीय यंत्रणा उभारण्याबरोबरच कामांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाधारित संनियंत्रण प्रणाली विकसित करावी. विविध विभागांच्या कामांचे एकत्रीकरण करून परस्पर समन्वयातून अंमलबजावणी करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. जलसंधारणाची कामे केवळ कागदावरील नियोजनापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात परिणामकारकपणे पूर्ण झाली पाहिजेत. पहिला पाऊस पडताच पाणी अडविण्यासाठी जलसंधारणाच्या संरचना सज्ज असतील आणि त्यातून भूजलपातळीत वाढ होण्यास मदत होईल, अशा पद्धतीने कामांचे नियोजन व अंमलबजावणी करावी. या प्रयत्नांतून गावांना दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने ठोस पावले टाकता येतील आणि जनतेला मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. जलसंधारणाची ही महत्त्वपूर्ण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी एकजुटीने सहभागी व्हावे आणि या मोठ्या लढाईसाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

या बैठकीस नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ए.टी.ई. चंद्रा फाउंडेशनचे अमित चंद्रा, पानी फाउंडेशनचे सत्यजित भटकळ, अभिनेते आमिर खान, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते. पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

### जलसंवर्धनासाठी लोकसहभाग वाढवणे आवश्यक

आगामी उन्हाळ्यापासून जलसंधारणाची कामे सातत्याने राबविण्याचे गरजेचे आहे. जानेवारी ते मे या कालावधीत शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती उपक्रम राबवून पावसाळ्यापूर्वी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात येईल. यंदाचे वर्ष आव्हानात्मक असले, तरी निराशेचे रूपांतर आशेत करून जनतेमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे आवश्यक आहे. पाण्याचा पुनर्वापर, भूजल पुनर्भरण आणि जलस्रोतांचे संवर्धन यावर भर देतानाच, राज्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक घराने जलसंवर्धनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असेही अभिनेते आमिर खान यांनी यावेळी सांगितले.

# सप्तश्रृंगगडावर नवरात्रोत्सवात प्लॅस्टिक पिशव्यांना बंदी, उन्हापासून संरक्षणाची व्यवस्था

**महाईन्यूज । नाशिक**

**सप्तश्रृंगगड उत्तर महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या श्री सप्तश्रृंगी देवीचा नवरात्र उत्सव यंदा ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन, ग्रामपंचायत, सप्तश्रृंगगड व सप्तश्रृंगी निवासिनी देवी ट्रस्टच्या वतीने गडावर जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. यंदा उत्सव काळात १२ ते १३ लाख भाविक येण्याचा अंदाज असून प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी घालण्यात आली आहे.**



नवरात्रोत्सव काळात ग्रामपंचायतीने प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी घातली असून प्लॅस्टिक आढळल्यास व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. स्वच्छतेसाठी गडावरील ग्रामपंचायतीच्या वतीने सुमारे १५० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. उन्हापासून भाविकांचे संरक्षण व्हावे यासाठी पहिली पायरी ते दवाखाना तसेच दवाखाना ते पोलीस चौकीदरम्यानच्या उतरत्या पायरीलगत संपूर्ण मार्गावर डोम उभारण्यात आले आहेत.

भाविकांच्या वाहतुकीसाठी नांदुरी ते सप्तश्रृंगी गड, यासाठी लोकल शटल बससेवा सुरू करण्यात येणार असून त्यासाठी ८० ते ९० बस उपलब्ध ठेवण्यात येणार आहेत. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आदी ठिकाणांहून येणाऱ्या बस नांदुरी येथे गडाच्या पायथ्याशी थांबविण्यात येणार आहेत. तसेच नांदुरीहून जाण्यासाठी बसची व्यवस्था करण्यात येणार आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने उत्सव काळात दोन अधिकारी उपस्थित राहणार असून हॉटेलमधील खाद्यपदार्थ, प्रसाद, पाणी तसेच ट्रस्टच्या प्रसादालयातील नमुने घेऊन विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.

उत्सव काळात देवी मंदिर २४ तास खुले ठेवण्यात येणार आहे. गर्दी वाढल्यास पायऱ्यांवर ठिकठिकाणी बॅरिकेडिंग करून टप्प्याटप्प्याने भाविकांना मंदिरात प्रवेश देण्यात येणार आहे. प्रदक्षिणा मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे.

### चार ठिकाणी लावणार मेटल डिटेक्टर

भाविकांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छता व इतर मूलभूत सुविधांची विशेष व्यवस्था केली जाणार आहे. पहिल्या पायरीजवळ दोन ठिकाणी आणि मंदिर परिसरात दोन ठिकाणी असे चार मेटल डिटेक्टर बसविण्यात येणार आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांसह होमगार्ड, नागरी सुरक्षा दल व आपदा सुरक्षा दलाच्या जवानांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाच्या वतीने सप्तश्रृंगी गड व नांदुरी येथे कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय पाच रुग्णवाहिका व तीन १०८ कार्डियाक रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येणार आहेत.

# ध्रुव राठीला ताब्यात घेताच नवा वाद

## संविधानातील कलम १९ नुसार परदेशी नागरिकांना भारतात आंदोलन करता येतं का? कायदा काय सांगतो?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली आज १० ऑक्टोबरला दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन पुकारण्यात आले होते. पण, दिल्लीच्या पोलीस प्रशासनाने आंदोलनापूर्वीच आंदोलकांचे सर्व मार्ग रोखले आहेत. त्यातच यूट्यूबर ध्रुव राठीला सीजेपीच्या आंदोलनापूर्वी ताब्यात घेण्यात आले. आज सकाळी दिल्ली पोलिसांनी त्याच्या गुरुग्राममधील घरातून त्याला ताब्यात घेतले. तो सीजेपीच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी जर्मनीहून भारतात आला होता. या घडामोडीमुळे एक महत्वाचा प्रश्न समोर आला आहे. भारतात एखाद्या परदेशी नागरिकाला आंदोलनात सहभागी होता येते का?**



दरम्यान, ध्रुव राठीने ८ ऑक्टोबरला एसआयआर प्रक्रियेविरोधातील बंगळुरूमधील एका आंदोलनातही सहभाग घेतला होता. त्यानंतर बंगळुरूचे माजी पोलीस आयुक्त व भाजपा नेते भास्कर राव यांनी ध्रुव राठीच्या विरोधात केंद्रीय गृह मंत्रालयाकडे धाव घेतली. राठीचे नागरिकत्व, पासपोर्ट, व्हिसाच्या अटींचे पालन यांची पडताळणी करावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

सीजेपीने १० ऑक्टोबरला दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलनाची हाक दिली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांनी एसआयआर प्रक्रियेत एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला. ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते; पण पोलीस प्रशासनाने त्याआधीच कडक निर्बंध लावले आहेत. या घटनेमुळे परदेशी नागरिकांच्या भारतातील राजकीय आंदोलनांमधील सहभागाबाबतचे कायदे आणि नियम पुन्हा चर्चेत आले आहेत. परदेशी नागरिकांना भारतात आंदोलन करण्याचा अधिकार आहे का आणि त्यांच्या सहभागावर कोणते कायदेशीर निर्बंध लागू होतात? हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

मात्र, याचा अर्थ परदेशी नागरिकांना राज्यघटनेचे संरक्षण मिळत नाही, असा नाही. अनुच्छेद १४ नुसार, भारतातील प्रत्येक व्यक्तीला कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे. तर अनुच्छेद २१ प्रत्येक व्यक्तीला जीवनाचे आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण बहाल करतो. त्यामुळे परदेशी नागरिकांनाही परिस्थितीनुसार या घटनात्मक संरक्षणांचा आधार घेता येतो. भारतात असताना त्यांच्यावर लागू होणाऱ्या कायद्यांनुसारच त्यांच्यावरील कारवाईबाबतचा निर्णय घेतला जातो. मात्र, भारतीय नागरिकांप्रमाणे परदेशी नागरिकांना आंदोलनाचा समान घटनात्मक अधिकार नाही. मात्र, भारतीय नागरिकांप्रमाणे परदेशी नागरिकांना आंदोलनाचा समान घटनात्मक अधिकार नाही. सार्वजनिक आंदोलनात सहभागी होताना त्यांना देशातील कायद्यांचे पालन करावे लागते. त्यांनी केलेल्या कृतींचा आणि त्यांच्यावर होणाऱ्या कारवाईचा विचार लागू असलेल्या कायद्यांच्या आधारेच केला जातो.

### परदेशी नागरिकांना भारतात आंदोलन करता येते का?

भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकारांच्या बाबतीत भारतीय नागरिक आणि देशात राहणाऱ्या परदेशी व्यक्तींना वेगळ्या तरतुदी लागू केल्या आहेत. राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१)(अ) नुसार, भारतीय नागरिकांना भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. तसेच, अनुच्छेद १९(१)(ब)नुसार त्यांना शस्त्रांशिवाय शांततेत एकत्र येण्याचा मुलभूत अधिकार आहे. मात्र, परदेशी नागरिकांना हे विशेष अधिकार आपोआप मिळत नाहीत. म्हणजेच एखादा परदेशी नागरिक भारतात आला म्हणून त्याला भारतीय नागरिकांप्रमाणे आंदोलनात सहभागी होण्याचा थेट मूलभूत अधिकार प्राप्त होत नाही.

---

## बापरे! फ्लायदुबईच्या 'त्या' को-पायलटचे ९/११ हल्ल्याशी कनेक्शन? धक्कादायक सत्य समोर

**महाईन्यूज । अमेरिका**

**फ्लायदुबईच्या एका विमानामध्ये भारतीय कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला करणाऱ्या ओमानच्या को-पायलटबद्दल यूएईच्या तपासात मोठा खुलासा झाला आहे. हा २९ वर्षीय को-पायलट इस्रायलमधील तेल अवीव येथील बेन गुरियन विमानतळावर हे विमान क्रॅश करून अमेरिकेतील ९/११ हल्ल्याची पुनरावृत्ती करू इच्छित होता. त्याच्या या भयानक कृत्यामुळे विमानात प्रवास करणाऱ्या १७० हून अधिक प्रवाशांचा जीव टांगणीला लागला होता, मात्र भारतीय कॅप्टन आणि प्रवाशांच्या प्रसंगावधानामुळे एक मोठा अनर्थ टळला.**



यूएईचे अटॉर्नी जनरल हमद सैफ अल शम्सी यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा को-पायलट सुमारे १० वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियात शिक्षण घेत असताना कट्टरपंथी विचारसरणीच्या प्रभावाखाली आला होता. 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या वृत्तानुसार, हम्माम अल-हम्मामी नावाच्या या तरुणाने २०१५ ते २०१७ दरम्यान मेलबर्नच्या आरएमआयटीमधून शिक्षण घेतले होते, पण त्याने अभियांत्रिकीची डिग्री पूर्ण केली नाही. याच काळात तो इंटरनेटवर दहशतवादी संघटना, आत्मघाती हल्ले आणि मुस्लिम ब्रदरहुडशी संबंधित साहित्य वाचू लागला. 'तकफीर' नावाच्या अत्यंत धोकादायक विचारसरणीने त्याच्या मनाचा ताबा घेतला होता, ज्यानुसार एक मुस्लिम दुसऱ्या मुस्लिम व्यक्तीलाही धर्मबाह्य मानू शकतो.

तपासात असेही पुढे आले आहे की, या तरुणाने केवळ दहशतवादी कृत्य करण्यासाठीच पायलट बनण्याचा मार्ग निवडला होता. त्याने जानेवारी २०२६ मध्ये फ्लायदुबई कंपनी जॉइन केली होती. त्यापूर्वी तो ओमान एअर आणि रॉयल एर मारोक कंपनीतही कार्यरत होता. इस्रायलच्या तेल अवीव शहराकडे जाणाऱ्या दोन उड्डाणांच्या माध्यमातून त्याने मार्गाची सखोल माहिती गोळा केली होती. इतकेच नव्हे, तर कट्टर सामग्री पाहण्यासोबतच त्याने स्वतःला शारीरिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बॉक्सिंगचे धडेही घेतले होते. हा संपूर्ण कट त्याने एकट्यानेच रचल्याचा दावा केला आहे. या संपूर्ण प्रकरणाने विमान प्रवासाच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. फ्लायदुबईमध्ये रुजू होण्यापूर्वी त्याने सर्व कायदेशीर सुरक्षा तपासण्या आणि चांगल्या आचरणाचे प्रमाणपत्र सादर केले होते, ज्यामुळे तो यंत्रणांच्या जाळ्यात आला नाही.

### नेमका काय घडला थरार?

विमान हवेत असतानाच को-पायलटच्या डोक्यात दहशतवादी किडा वळवळला आणि त्याने थेट कुऱ्हाड उगारून कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर हल्ला केला. विमानात बसलेले बहुतांश प्रवासी इस्रायली नागरिक होते. को-पायलटला हे विमान थेट बेन गुरियन विमानतळावर कोसळवून अधिकाधिक लोकांचे जीव घ्यायचे होते. मात्र, कॅप्टन स्मित यांनी प्रचंड धाडस दाखवत कॉकपिटचा दरवाजा उघडला आणि प्रसंगावधान राखत प्रवाशांच्या मदतीने या हल्लेखोराला वेळीच जेरबंद केले. त्यानंतर विमानातील इतर पायलटनी सूत्रे हातात घेत हे विमान सौदी अरेबीयात अगदी सुरक्षितपणे खाली उतरवले.

# ‘दृश्यम 3’ची 400 कोटींची कमाई!

बॉलिवूड अभिनेता अजय देवगणच्या ‘दृश्यम ३’ चित्रपटाची बॉक्स ऑफिसवरील यशस्वी घोडदौड सुरूच आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, दुसऱ्या आठवड्याच्या सुरुवातीलाही चित्रपटाने दमदार कमाई करत बॉक्स ऑफिसवरील आपला दबदबा कायम ठेवला आहे.

समोर आलेल्या मीडिया रिपोर्ट्सनुसार, ‘दृश्यम ३’ने जगभरात ४०० कोटी रुपयांचा मोठा टप्पा ओलांडला असून चित्रपटाचे एकूण कलेक्शन ४०७ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आता हा चित्रपट ५०० कोटींचा आकडा गाठणार का, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, चित्रपटाने आठव्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी १४,५८३ शोमधून सुमारे १४.५० कोटी रुपयांची कमाई केल्याचे वृत्त आहे. या आकडेवारीनुसार, चित्रपटाचे भारतातील नेट कलेक्शन २६० कोटी रुपये, तर एकूण देशांतर्गत कलेक्शन ३१२ कोटी रुपयांपर्यंत पोहचले आहे.



दुसरीकडे, परदेशातील कमाईनेही चित्रपटाच्या एकूण कलेक्शनमध्ये भर घातली आहे. परदेशात आठव्या दिवशी सुमारे ६ कोटी रुपयांची कमाई झाल्याचा आणि एकूण परदेशी कलेक्शन ९५ कोटी रुपयांवर पोहोचल्याचा दावा मीडिया रिपोर्ट्समध्ये करण्यात आला आहे.

या आकडेवारीनुसार, चित्रपटाची जगभरातील एकूण कमाई ४०७ कोटी रुपयांवर गेल्याचे सांगितले जात आहे. ‘दृश्यम ३’चे बजेट अंदाजे ११० कोटी रुपये आहे. चित्रपटाने आपल्या बजेटच्या तुलनेत मोठी कमाई केली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, २०२६ मधील सर्वाधिक नफा कमावणाऱ्या चित्रपटांच्या यादीत ‘दृश्यम ३’ पाचव्या स्थानावर आहे. या यादीत ‘हनुमान अंश’, ‘धुरंधर २’, ‘आवारापन २’ आणि ‘मिर्झापूर द मूव्ही’ या चित्रपटांचा समावेश आहे.



# ‘की अँड का 2’मध्ये कियारा!

२०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘की अँड का’ या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगली चर्चा मिळाली होती. या चित्रपटात करीना कपूर खान आणि अर्जुन कपूर यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. स्त्री आणि पुरुष यांच्या पारंपरिक भूमिका, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि करिअर यांसारख्या विषयांवर या चित्रपटातून वेगळ्या पद्धतीने भाष्य करण्यात आले होते. दिग्दर्शक आर. बाल्की यांनी या चित्रपटाच्या माध्यमातून समाजात रूढ असलेल्या स्त्री-पुरुषांच्या भूमिकांवर प्रश्न उपस्थित करत एक अनोखा आणि मनोरंजक विषय प्रेक्षकांसमोर मांडला होता. आता याच चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची तयारी सुरू झाली आहे. ‘की अँड का 2’ असे या आगामी चित्रपटाचे नाव असण्याची शक्यता असून, यामध्ये कियारा अडवाणी नायिकेच्या भूमिकेत दिसणार असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, नव्या चित्रपटात पहिल्या भागातील कथा पुढे नेली जाणार नाही. त्याऐवजी ‘की’ आणि ‘का’ या पात्रांच्या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून एक नवी आणि स्वतंत्र कहाणी मांडली जाणार आहे. त्यामुळे या वेळी प्रेक्षकांना कोणत्या प्रकारचा विषय पाहायला मिळणार, याबाबत उत्सुकता आहे. कियारा अडवाणीच्या जोडीला कोणता अभिनेता मुख्य भूमिका साकारणार, हे अद्याप निश्चित झालेले नाही. त्यामुळे या चित्रपटातील नायकाच्या नावाबाबतही प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण होऊ शकते. चित्रपटाच्या निर्मितीपूर्व कामाला सध्या सुरुवात झाली असून, चालू वर्षाच्या अखेरपर्यंत चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती आहे.



# पलकच्या बर्थडे लूकची सोशल मीडियावर चर्चा!

टेलिव्हिजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री श्वेता तिवारीची मुलगी आणि अभिनेत्री पलक तिवारी सध्या तिच्या वाढदिवसाच्या फोटोंमुळे चर्चेत आहे. पलकने तिच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनमधील काही खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये तिचा ग्लॅमरस अंदाज पाहायला मिळत असून, चाहत्यांकडून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. केक, रंगीबेरंगी फुगे आणि आनंदी क्षणांनी सजलेल्या या सेलिब्रेशनची सध्या सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. पलक तिवारी ही बॉलिवूड आणि मनोरंजन विश्वातील चर्चेत असलेली अभिनेत्री आहे. तिची आई श्वेता तिवारी हिने टेलिव्हिजन विश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता पलकही आपल्या अभिनयामुळे आणि स्टायलिश अंदाजामुळे चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे. नुकताच पलकचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या खास दिवसाचे काही सुंदर क्षण तिने चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या फोटोंमधून तिच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनची झलक पाहायला मिळते. आपल्या जवळच्या व्यक्तींसोबत आनंदाचे क्षण घालवताना पलक या फोटोंमध्ये दिसत आहे. वाढदिवसाच्या पार्टीसाठी पलकने तपकिरी रंगाचा सुंदर ड्रेस परिधान केला होता. या ड्रेसवर करण्यात आलेले ग्लिटर वर्क तिच्या लूकला खास आकर्षक बनवत आहे. तिच्या या लूकची सोशल मीडियावर चर्चा होत असून, चाहत्यांना तिच्या स्टाइलची झलक पाहायला मिळत आहे.

# वयाच्या ४२ व्या वर्षी 'मिस्टर ३६०'चे रौद्ररूप!

## एबी डिव्हिलियर्सचे अवघ्या ३७ चेंडूंत वादळी शतक; दक्षिण आफ्रिकेचा ऑस्ट्रेलियावर विजय

**महाईन्यूज । शारजाह**

**वय हा फक्त आकडा असतो हे वाक्य प्रतिभावान क्रिकेटपटू मैदानावर अनेकदा सत्यात उतरवताना दिसतात. आपल्या ३६० डिग्री फलंदाजीसाठी ओळखला जाणारा दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज एबी डिव्हियर्सने वादळी शतकी खेळी साकारली आहे. एबीने वायाच्या ४२व्या वर्षीही मैदानावर उतरत ३७ चेंडूंत झंझावाती शतक साकारलं. वर्ल्ड चॅम्पियन्स ऑफ लिजेंड्स स्पर्धेत त्याने ही खेळी साकारली.**





एबी डिव्हिलियर्स निवृत्त होऊन बराच काळ लोटला असला, तरी त्याच्या फलंदाजीची ताकद आणि नैपुण्य आजही विलक्षण आहे. शारजाहमध्ये सध्या सुरू असलेल्या ‘वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स’मध्ये अवघ्या ३७ चेंडूंत शतक झळकावून त्याने हे पुन्हा एकदा सिद्ध केलं. एबीने ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्सच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली आणि त्याच्या आक्रमक खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्सने अवघ्या १५.४ षटकांत २१० धावांचं लक्ष्य गाठलं.

एबी डिव्हिलियर्स सुरुवातीच्या तीन चेंडूंवर खातंही न उघडता खेळत होता.. सातव्या चेंडूवर त्याने आपला पहिला षटकार खेचला आणि त्यानंतर चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. त्याने केवळ ऑस्ट्रेलियाचे वेगवान गोलंदाज बेन लॉफलिन आणि केन रिचर्डसन यांचीच चांगलीच धुलाई केली नाही, तर लेग-स्पिनर फवाद अहमदच्या फिरकीची चांगलीच भिंगरी उडवली.

डी व्हिलियर्सने २३ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केलं आणि पुढील १४ चेंडूंत शतक गाठलं. बेन हिल्फेनहॉसच्या एका चेंडूवर षटकार मारून त्याने आपलं शतक पूर्ण केलं.

‘वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स’मध्ये एबी डिव्हिलियर्स जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. या फलंदाजाने स्पर्धेतील आपल्या गेल्या सात डावांमध्ये तीन शतकं झळकावली आहेत, तर या खेळींमध्ये दोन अर्धशतकांचाही समावेश आहे. केवळ एका डावात त्याला मोठी धावसंख्या उभारता आली नाही, जिथे तो केवळ सहा धावा करू शकला; त्याव्यतिरिक्त, त्याने प्रत्येक खेळीत आपल्या नावाला साजेशी दणदणीत कामगिरी केली आहे. वयाची ४२ वर्षे पूर्ण झालेली असूनही तो अजूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिकेट खेळत आपल्या नावाची छाप पाडत आहे.

# अर्धशतक हुकलं, पण तिलक वर्माने मोडला विराटचा मोठा रेकॉर्ड!

**महाईन्यूज । मुंबई**

**भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांमध्ये झालेल्या दुसऱ्या टी सामन्यात भारतीय २४९ धावांचा डोंगर उभारला. यादरम्यान संजू सॅमसनने ८२ धावांची खेळी करून दमदार सुरुवात करून दिली. तर पुन्हा एकदा तिलक वर्माने ४४ धावांची खेळी करून फिनिशिंग टच दिला. या खेळीच्या बळावर त्याने टी-२० क्रिकेटमध्ये ५००० धावा पूर्ण केल्या आहेत. आपल्या टी-२० कारकिर्दीतील १७५ सामन्यातील १६६ डावात ४१. ५७ च्या सरासरीने ५०३१ धावा केल्या आहेत. यासह टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५००० धावा करण्याच्या रेकॉर्डमध्ये त्याने विराट कोहलीला मागे टाकलं आहे.**







टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५००० धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत केएल राहुल अव्वल स्थानी आहे. केएल राहुल भारतीय टी-२० संघातून बाहेर आहे, पण टी-२० क्रिकेटमध्ये अजूनही त्याचा दबदबा आहे. केएल राहुलने अवघ्या १४३ डावात ५००० धावांचा पल्ला गाठला होता. केएल राहुलने आतापर्यंत ८७१८ धावा केल्या आहेत.

तिलक वर्मा आणि केएल राहुलसह शुबमन गिल, ऋतुराज गायकवाड आणि अभिषेक शर्मासारख्या फलंदाजांचा देखील या यादीत समावेश आहे. अभिषेक शर्मा आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो. त्यामुळे तो या यादीत असणं साहजिक आहे. पण केएल राहुल आणि शुबमन गिलसारखे फलंदाज देखील या यादीत पुढे आहेत.

### टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५००० धावा करणारे भारतीय फलंदाज

- केएल राहुल -१४३ डावात
- ऋतुराज गायकवाड – १४५ डावात
- शुबमन गिल – १५४ डावात
- अभिषेक शर्मा – १६५ डावात
- तिलक वर्मा – १६६ डावात

### भारतीय संघाचा पराभव

या सामन्यात भारतीय संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. प्रथम फलंदाजी करताना संजू सॅमसनने सर्वाधिक ८२ धावांची खेळी केली. तर तिलक वर्मने ४४ आणि इशान किशनने ४३ धावा केल्या. भारतीय संघाने २४९ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या वेस्ट इंडिजकडून शे होपने नाबाद १०२ धावांची खेळी केली. वेस्ट इंडिजने ९ चेंडू शिल्लक ठेवून सामना आपल्या नावावर केला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

। रविवार ।

दि. 11 ऑक्टोबर 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला विद्यार्थ्यांची शौर्यपूर्ण मानवंदना!

## वसेवाडी–सणसवाडीच्या विद्यार्थ्यांनी सादर केली लाठी-काठी अन् तलवारबाजीची थरारक प्रात्यक्षिके

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, जिद्द आणि कौशल्याची कमतरता नसते; त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, याचा प्रत्यय पुणे जिल्ह्यातील वसेवाडी–सणसवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी दिला. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा आणि महाराष्ट्राच्या पारंपरिक युद्धकलांमध्ये आपली प्रतिभा सिद्ध करणाऱ्या या शाळेतील ५७ विद्यार्थ्यांनी मोशी येथील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' येथे भेट देत धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या १४० फुटी पुतळ्याला मानवंदना अर्पण केली. या वेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लाठी-काठी आणि तलवारबाजीच्या थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.**



आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' या स्मारकस्थळी विद्यार्थ्यांनी आपल्या युद्धकलेचे कौशल्य सादर केले. शिस्तबद्ध हालचाली, चपळता, आत्मविश्वास आणि सांघिक समन्वय यांच्या जोरावर विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या समृद्ध शौर्यपरंपरेचे प्रभावी दर्शन घडवले. छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाला मानवंदना अर्पण करण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा आणि पारंपरिक युद्धकलांचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

वसेवाडी–सणसवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे सर्वांत उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे सुमारे २०० विद्यार्थिनींचे लाठी-काठी पथक आणि तलवारबाजी पथक. पारंपरिक युद्धकलांचे प्रशिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थिनी आपल्या कौशल्यातून शिस्त, धैर्य आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडवत आहेत. मुलींचा अशा युद्धकलांमधील सहभाग ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या क्षमतेची आणि त्यांना मिळणाऱ्या संधींची साक्ष देणारा आहे.

शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता, एकाग्रता, नेतृत्वगुण आणि सांघिक भावना विकसित व्हावी, या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित होते. पारंपरिक युद्धकलांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कामही या विद्यार्थ्यांकडून होत आहे.

शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या या शाळेला सन २०२५–२६ मध्ये पुणे जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. शिक्षणाबरोबरच क्रीडा, पारंपरिक युद्धकला आणि विविध कौशल्यांच्या विकासाला प्रोत्साहन देणारी शाळा म्हणून तिने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणारी ही शाळा विशेष उल्लेखनीय मानली जाते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या अंगभूत गुणांना वाव देण्यावर शाळेचा भर असल्याचे या कामगिरीतून दिसून येते.

### ग्रामीण गुणवत्तेचा प्रेरणादायी आविष्कार

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य व्यासपीठ, प्रशिक्षित मार्गदर्शक आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवू शकतात, हे वसेवाडी–सणसवाडीच्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले आहे. १४० फुटी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर सादर केलेली युद्धकलेची प्रात्यक्षिके ही विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे दर्शन घडवणारी ठरली. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या शौर्यपरंपरेविषयी अभिमान आणि पारंपरिक कलांचे जतन करण्याची प्रेरणाही या उपक्रमातून मिळाली. ग्रामीण भागातील शाळा केवळ शिक्षण देणाऱ्या संस्था न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी व्यासपीठ बनू शकतात, हे या शाळेच्या वाटचालीतून स्पष्ट होते.

### हिंदुभूषण स्मारक ट्रस्टकडून शिक्षकांचे अभिनंदन

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने शाळेतील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कौशल्यामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रशिक्षण, मेहनत आणि शिस्त यांचा महत्त्वाचा वाटा असतो. विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांचे यानिमित्ताने कौतुक करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा कौशल्य आणि पारंपरिक युद्धकला यांचा संगम साधणारी वसेवाडी–सणसवाडी जिल्हा परिषद शाळा ग्रामीण शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. या विद्यार्थ्यांच्या कामगिरीमुळे ग्रामीण भागातील गुणवत्तेला नवे व्यासपीठ मिळण्याबरोबरच महाराष्ट्राच्या समृद्ध युद्धकला परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याचा संदेशही अधोरेखित झाला आहे.

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या १३ विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**महाईन्यूज** | पिंपरी- चिंचवड

**क्रीडा सेवा संचालनालय, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम कौशल्याचे प्रदर्शन करत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. या स्पर्धेत शाळेतील एकूण १३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.**



कठिन आव्हानांचा सामना करत विद्यार्थ्यांनी सर्वोत्तम खेळ करत उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये रिजवान अख्तर याने उत्कृष्ट खेळाच्या जोरावर द्वितीय क्रमांक (रजत पदक) पटकावला. तर उत्तम भाटी, कार्तिक तांबे, युवराज पाटुकले, धनराज जाधव, शाम माळी, कार्तिक गावडे आणि संजू भाटी या सात खेळाडूंनी आक्रमक आणि कौशल्याधिष्ठित प्रदर्शन करत तृतीय क्रमांक (कांस्य पदक) मिळवला.

याशिवाय स्वयंम माने, रईस शेख, प्रतीक प्रजापती आणि अर्णव जांभुळकर यांनी या जिल्हास्तरीय स्पर्धेत पूर्ण ताकदीने सहभाग नोंदवून उल्लेखनीय कामगिरी केली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार सर, सचिव अशोक मोरे सर, खजिनदार सुरेखा पवार मॅडम, उपाध्यक्ष श्री. निलेश पलघोमल सर तसेच संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, मुख्याध्यापिका सौ. विद्या नाईक मॅडम, नायगम अग्निस मॅडम, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि क्रीडा शिक्षक यशवंत माने यांनी सर्व पदकविजेत्या व सहभागी खेळाडूंचे कौतुक केले आणि त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# चिखलीत अनधिकृत बांधकामांवर हातोडा!

## ५ बेकायदा बांधकामे, १२०० चौरस मीटरचे अतिक्रमण जमीनदोस्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'फ' तोरणा क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने प्रभाग क्रमांक १, चिखली शरद नगर गल्ली नंबर आठ परिसरात अनधिकृत बांधकामांविरोधात धडक कारवाईची मोहीम राबवण्यात आली. मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या थेट आदेशानुसार ही धडक मोहीम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेत परिसरातील एकूण ५ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली असून, सुमारे १२०० चौरस मीटर क्षेत्रावरील बेकायदा बांधकाम महापालिकेच्या पथकाने हटवले.**



सदर कारवाई 'फ' क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रत्यक्ष उपस्थितीत पार पडली. अनधिकृत बांधकामे हटवण्यासाठी महापालिकेने चोख पूर्वतयारी केली होती. यासाठी उपअभियंता हेमंत घोड, बीट निरीक्षक साईनाथ देसाई, प्रफुल भोकरे, ऐश्वर्या मासाळ आणि सूरज माने यांच्यासह महापालिकेचे अन्य अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते.

कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था राखली जावी यासाठी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यामध्ये अतिक्रमण विभागाचे ६ पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे (MSF) ५० जवान यांच्यासह महापालिकेचे २ मजूर आणि १० कंत्राटी मजूर सहभागी झाले होते. ही बेकायदा बांधकामे निष्कासित करण्यासाठी महापालिकेने २ ट्रॅक्टर ब्रेकर आणि २ जेसीबी यंत्रांचा वापर करून अवघ्या काही तासांत सर्व अतिक्रमणे हटवली. महापालिकेने अचानक घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे चिखली परिसरातील अनधिकृत बांधकाम व्यावसायिकांचे धाबे दणाणले असून, शहरात यापुढेही अशी धडक कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलचा संगीत बँड स्पर्धेत डंका!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



मोठ्या उत्साहातआणि चुरशीच्या वातावरणात पार पडलेल्या संगीत बँड स्पर्धेत आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत 'प्रथम उपविजेतेपद' (1st Runner-up) पटकावले आहे. या दैदिप्यमान यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून शैक्षणिक वर्तुळातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सदर स्पर्धेत परिसरातील १० नामांकित शाळांनी सहभाग घेतला होता. अटीतटीच्या व अत्यंत रंगतदार झालेल्या या संगीत महोत्सवात आर. के. एल. गॅलेक्सीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या सुरेल सादरीकरणाने आणि शिस्तबद्ध वादनाने परीक्षक व उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या या कठोर परिश्रमाचे आणि उत्कृष्ट समन्वयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) डॉ. पुष्कर चोबे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, संगीत शिक्षक आणि मार्गदर्शकांचे मनापासून अभिनंदन केले आहे. "विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आमची शाळा नेहमीच कटिबद्ध आहे, हा विजय आमच्या शिस्तीचा आणि कष्टाचा परिपाक आहे," अशा शब्दांत डॉ. पुष्कर चोबे यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

शाळेचे नाव उंचावणाऱ्या सर्व संगीत कलाकारांवर आणि मार्गदर्शक शिक्षकांवर कौतुकाचा वर्षाव होत असून, पालक वर्गातूनही प्रचंड आनंद व्यक्त केला जात आहे.

## 'मी... माझा प्रवास' या चर्चासत्राचे मंगळवारी पीसीसीओई मध्ये आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**'मी... माझा प्रवास, अनेक भूमिका आणि सुवर्णमध्य' या चर्चासत्राचे मंगळवारी (दि. १३) पीसीसीओई मध्ये आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १०:३० वाजता, मेकॅनिकल सेमिनार हॉल येथे होणार आहे. या चर्चासत्रात सिटी प्राईड स्कूलच्या प्राचार्य डॉ. कांचन देशपांडे, कायदा सल्लागार ॲड. परिक्रमा खोत, स्त्री रोग तज्ञ डॉ. क्षमा उपलेंचवार, न्यू एज फायर फायटिंग कंपनी संचालक सुजल शाह आदी सहभागी होणार आहेत.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील उद्योजक नरेंद्र लांडगे अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक निळकंठ चोपडे, अंतर्गत तक्रार समिती उपाध्यक्ष सहा.प्रा. वृषाली भालेराव, अधिष्ठाता डॉ. एस. यु. भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

महिलांना कौटुंबिक, व्यावसायिक जबाबदाऱ्या सांभाळताना, वैयक्तिक आयुष्यात समतोल राखताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. या विषयीचे त्यांचे अनुभव, तसेच विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांना त्यांचा व्यवसायिक प्रवास, आव्हाने तसेच दैनंदिन जबाबदाऱ्या प्रभावीपणे सांभाळण्याचे व्यावहारिक उपाय आदी विषयांवर महिलांचे विचार मंथन व्हावे त्यासाठी एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या चर्चासत्राचा मुख्य उद्देश आहे असे अंतर्गत तक्रार समिती उपाध्यक्ष सहा.प्रा. वृषाली भालेराव यांनी सांगितले.

# ‘इनर रिंग रोड’साठी जमीन मोजणीचा मार्ग मोकळा

## मुळशी, मावळ, हवेली तालुक्यांत ग्रामबैठकांना सकारात्मक प्रतिसाद!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील वाहतूक कोंडीवर शाश्वत तोडगा काढण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हाती घेतलेल्या प्रस्तावित ‘इनर रिंग रोड’च्या भूसंपादन प्रक्रियेला गती मिळत आहे. मुळशी, मावळ आणि हवेली तालुक्यांतील विविध गावांमध्ये आयोजित मोजणीपूर्व ग्रामबैठकांना ग्रामस्थांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, मुळशीतील चार गावांमध्ये प्रत्यक्ष जमीन मोजणीच्या तारखाही निश्चित करण्यात आल्या आहेत. हवेली तालुक्यातील मांजरी खुर्द येथे दि. १३, तर कोलवडी येथे १५ ऑक्टोबरपासून मोजणी सुरू होणार आहे.**



> शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन भूसंपादनाची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत आहे. जमीन मोजणीनंतर बाजारभाव आणि संबंधित खरेदी-विक्री व्यवहारांचा विचार करून मोबदल्याचे मूल्यांकन केले जाईल. कोणत्याही बाधित शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही, याची प्रशासनाकडून दक्षता घेतली जात आहे.
>
> - विठ्ठल उदमले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २२)

प्रस्तावित इनर रिंग रोडची रुंदी ६५ मीटर असून, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना प्रत्येकी नऊ मीटर रुंदीचे सेवा रस्ते (सर्व्हिस रोड) उभारण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन प्रशासनाकडून मोजणीपूर्व ग्रामबैठका घेतल्या जात आहेत. या बैठकांमध्ये शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करून भूसंपादनाची प्रक्रिया, मोबदल्याचे मूल्यांकन आणि त्यासंदर्भातील कार्यपद्धती यांची माहिती दिली जात आहे. संवादातून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करण्यावर प्रशासनाचा भर आहे.

मुळशी तालुक्यातील हिंजवडी, जांबे, मारुंजी आणि नांदे या चार गावांतील ग्रामस्थांनी जमीन मोजणीस सहमती दर्शवली आहे. त्यानुसार हिंजवडी येथे १२ ऑक्टोबर, जांबे येथे १३ ऑक्टोबर, मारुंजी येथे १५ ऑक्टोबर, तर नांदे येथे १७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रत्यक्ष जमीन मोजणी करण्यात येणार आहे. नेरे आणि माण या गावांतील ग्रामस्थांशीही प्रशासनाचा संवाद सुरू असून, त्यांच्या स्थानिक मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच, हवेली तालुक्यातील मांजरी खुर्द येथे १३ ऑक्टोबरपासून जमिनींची संयुक्त मोजणी सुरू होणार आहे.

हवेली तालुक्यातील कोलवडी येथे ग्रामपंचायतीच्या सभागृहात झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांनी जमीन मोजणीस सहमती दर्शवली. या बैठकीत भूसंपादन उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्या आणि अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर १५ ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष जमीन मोजणी सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मोजणीद्वारे बाधित क्षेत्र निश्चित केल्यानंतर संबंधित विभागांमार्फत बाधित क्षेत्रातील घरे, झाडे, विहिरी, कूपनलिका आणि पाइपलाइन यांचे पंचनामे करण्यात येतील. भूसंपादनाच्या अधिसूचनेनंतर मागील तीन वर्षांतील खरेदी-विक्री व्यवहारांची माहिती मागवून जमिनींचे मूल्यांकन केले जाईल. या प्रक्रियेत संबंधित व्यवहार आणि बाजारभाव विचारात घेऊन मोबदला निश्चित केला जाईल. बाधित शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, असे उदमले यांनी स्पष्ट केले.

कोलवडीतील बैठकीत शेतकऱ्यांनी मांजरी खुर्दप्रमाणे बाजारभावानुसार मोबदला देण्याची मागणी केली. प्रकल्पाचे काम पुढे नेण्यासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक असल्याचे नमूद करून, मोबदला निश्चित करण्यासाठी प्रशासनाने तातडीने बैठक आयोजित करावी, अशी मागणी शेतकरी तथा पत्रकार अशोक आहाळे यांनी केली. मोजणी पूर्ण झाल्यानंतर बाधित क्षेत्राची माहिती प्रसिद्ध करून मोबदला निश्चित करण्यासाठी बैठक घेतली जाईल. शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून आणि कोणावरही अन्याय होणार नाही, या दृष्टिकोनातून निर्णय घेतले जातील, असे उदमले यांनी सांगितले.

या बैठकीस यशवंत सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष किशोर उंद्रे, नितेश झुले, उमेश मुरकुटे, सदाशिव उंद्रे, मधुकर उंद्रे, शिवाजी शेटके, आनंदा उंद्रे आणि कोलवडी ग्रामपंचायतीचे लिपिक संतोष गायकवाड यांच्यासह बाधित शेतकरी उपस्थित होते. पीएमआरडीएचे शाखा अभियंता कार्तिक पाटील, कनिष्ठ लिपिक रोहित चोपडे, मोजणी कर्मचारी मदन बारबरे आणि गावकामगार तलाठी अर्जुन साळी यांनीही बैठकीत सहभाग घेतला.

दुसरीकडे, मावळ तालुक्यातील धामणे येथे पद्मावती देवी मंदिरात झालेल्या बैठकीत ग्रामस्थांनी विकासाच्या दृष्टीने विविध पर्याय आणि मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. प्रशासनाने या सूचनांची सकारात्मक दखल घेतली. इनर रिंग रोडच्या भूसंपादनाची प्रक्रिया डिसेंबरअखेर पूर्ण करण्याचे पीएमआरडीएचे उद्दिष्ट आहे. ग्रामस्थांशी संवाद, पारदर्शक कार्यपद्धती आणि बाधित शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य या भूमिकेतून ही प्रक्रिया पुढे नेण्यात येत आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा पीएमआरडीएच्या जमीन व मालमत्ता विभागाच्या सहआयुक्त पूनम मेहता यांनी व्यक्त केली.

# देहू नगरपंचायतीच्या कचरा डेपोतील गैरकारभाराविरोधात भाजप आक्रमक!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पवित्र तीर्थक्षेत्र देहू नगरीतील कचरा डेपोवरील अयोग्य व्यवस्थापन आणि तेथे जाणीवपूर्वक कचरा जाळण्याच्या गंभीर प्रकाराविरोधात भारतीय जनता पार्टीने नगरपंचायत प्रशासनाविरोधात तीव्र आक्रमक पवित्रा घेतला आहे. यासंदर्भात भाजपच्या वतीने नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्री. चेतन कोंडे यांना निवेदन देऊन उपोषणासह तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. येत्या १० दिवसांत कचरा डेपोच्या कारभारात सुधारणा न झाल्यास थेट नगरपंचायत कार्यालयासमोर कचरा जाळणार आणि डेपोवर गाड्या अडवणार, असा सज्जड दम भाजपने दिला आहे.**




> नगरपंचायत प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे तीर्थक्षेत्र देहूतील नागरिकांचे आणि विशेषतः लहान मुले व वृद्धांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कचरा डेपोवर चाललेला बेकायदेशीर कारभार आणि बाहेरील कचरा टाकण्याचे प्रकार आता खपवून घेतले जाणार नाहीत. प्रशासनाने येत्या १० दिवसांत आमच्या रास्त मागण्यांची दखल न घेतल्यास, आम्ही नगरपंचायत कार्यालयासमोर कचरा जाळून तीव्र आंदोलन छेडू.
>
> - अनिरुद्ध काळोखे, अध्यक्ष, भाजप देहू.

संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा वारसा लाभलेल्या देहू नगरीत गेल्या काही काळापासून कचऱ्याची आणि आरोग्याची समस्या अत्यंत गंभीर बनली आहे. कचरा डेपोवर वारंवार कचरा जाळला जात असल्यामुळे दुर्गंधीयुक्त धुराचे साम्राज्य पसरून परिसरात मोठे प्रदूषण होत आहे. याचा सर्वाधिक फटका लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींना बसत असून, त्यांना श्वसनाचा गंभीर त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या जिवाशी सुरू असलेला हा खेळ प्रशासनाने त्वरित थांबवावा, अशी संतप्त मागणी केली जात आहे.

नगरपंचायत हद्दीबाहेरील कचरादेखील बेकायदेशीरपणे या डेपोवर आणून टाकला जात आहे. कचरा डेपोला पूर्ण कंपाऊंड नसल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांची पाळीव जनावरे अन्नाच्या शोधात तेथे जाऊन दलदलीत फसतात. यामुळे शेतकरी बांधवांचेही मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**भाजपच्या प्रमुख मागण्या:**

सुरक्षा व्यवस्था: कचरा डेपोवर २४ तास कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक (सिक्युरिटी गार्ड) नेमण्यात यावा.

बाह्य कचऱ्यास बंदी: देहू नगरपंचायत हद्दीबाहेरील कचरा गाड्यांना डेपोमध्ये प्रवेश देण्यास तात्काळ बंदी घालावी.

सीसीटीव्ही निगराणी: सुरक्षेसाठी संपूर्ण कचरा डेपो परिसरात २४ तास कार्यरत असणारे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.

शास्त्रोक्त व्यवस्थापन व कंपाऊंड: कचरा जाळणे त्वरित बंद करून शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावावी व डेपोला पूर्ण कंपाऊंड घालावे.

डेपोचे स्थलांतर: कचरा डेपो मुख्य रस्त्यापासून आणि रहिवासी क्षेत्रापासून किमान १००० मीटर (१ किमी) लांब नेण्यात यावा.

या संपूर्ण बेजबाबदार परिस्थितीला देहू नगरपंचायत प्रशासनच पूर्णपणे जबाबदार असल्याचा आरोप भाजपने केला आहे. प्रशासनाला सुधारणेसाठी १० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत ठोस पावले न उचलल्यास नगरपंचायत कार्यालयासमोरच कचरा आणून जाळला जाईल, तसेच डेपोवर कचऱ्याची एकही गाडी रिकामी करू दिली जाणार नाही. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या सर्व परिस्थितीस प्रशासनच जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

निवेदन देताना भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब जी काळोखे, भाजप मंडळ अध्यक्ष श्री. रघुवीर जी शेलार, भाजप मंडळ उपाध्यक्ष श्री. सचिन मराठे, अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे, श्री. संभाजी टिळेकर, श्री. कृष्णा मराठे, युवा उपाध्यक्ष दत्ता हगवणे, युवा सरचिटणीस प्रद्युम्न टिळेकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.